महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १३२ वे | दिनांक : ०८/०५/२०२६ | वार : शुक्रवार

## मोठी कारवाई ! बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक अटकेत



**बीड :** बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन आणि मावेजा घोटाळा प्रकरणात मोठी कारवाई करत पोलिसांनी तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अटक केली आहे. लातूरमधून त्यांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली. या अटकेमुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली असून, अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या भूसंपादन घोटाळ्याला आता नवे वळण मिळाले आहे. अविनाश पाठक यांना अटक केल्यानंतर त्यांना बीड न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहितीही समोर आली आहे.

या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक अर्थात एसआयटीमार्फत सुरू आहे. यापूर्वी या घोटाळ्यात दहा जणांविरोधात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्याचे सांगितले जात आहे. अविनाश पाठक यांची दिवसभर कसून चौकशी करण्यात आल्यानंतर अखेर पोलिसांनी त्यांना अटक केली. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी पूजा पवार करत होत्या. मात्र, त्या रजेवर असल्याने सध्या तपासाची जबाबदारी एम. व्यंकटराम यांच्याकडे देण्यात आली आहे.


नेमकं प्रकरण राष्ट्रीय महामार्गासाठी करण्यात आलेल्या भूसंपादनाशी संबंधित आहे. बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. शेतकऱ्यांना वाढीव मावेजा मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने बनावट आदेश तयार करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. या आदेशांवर बनावट सह्या करून कोट्यवधी रुपयांचा व्यवहार करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे शासनाची ७३ कोटी रुपयांहून अधिक फसवणूक झाल्याचे सांगितले जात आहे.

तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय महामार्ग अधिनियमांतर्गत वाढीव मोबदला मिळवण्यासाठी खातेदार जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करतात. मात्र, अविनाश पाठक यांची २२ एप्रिल २०२५ रोजी बदली झाल्यानंतरही त्यांच्या कार्यकाळातील मागील तारखा वापरून बनावट आदेश काढण्यात आले. या आदेशांच्या आधारे १५४ प्रकरणांमध्ये वाढीव मोबदला मंजूर करण्यात आल्याचा संशय आहे. या बनावट आदेशांमधून सुमारे २४१ कोटी ६२ लाख रुपयांचा वाढीव मावेजा मंजूर करण्यात आला होता.

यातील अंदाजे ७३ कोटी ४ लाख रुपये संबंधित खातेदारांना वितरित करण्यात आल्याची माहिती तपास यंत्रणेला मिळाली आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान भूसंपादन समन्वय कार्यालयात कोणतीही अधिकृत नोंद, रजिस्टर किंवा दस्तऐवजीकरण व्यवस्थित ठेवण्यात आले नव्हते. त्यामुळे या व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात संगनमत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तपास यंत्रणा आता या प्रकरणातील इतर संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थ्यांचीही चौकशी करत आहे.

दरम्यान, या अटकेनंतर बीड जिल्ह्यातील प्रशासन आणि महसूल विभागात मोठी चर्चा सुरू झाली आहे. राज्यातील भूसंपादन प्रक्रियेत पारदर्शकतेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एसआयटीकडून या घोटाळ्याचा सखोल तपास सुरू असून, आगामी काळात आणखी काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शासनाच्या निधीची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याने या प्रकरणाकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे.

## दहावीचा निकाल उद्या! दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या, शुक्रवार ८ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर होणार आहे. निकालापूर्वी सकाळी ११ वाजता मंडळाकडून पत्रकार परिषद घेऊन निकालाची अधिकृत घोषणा केली जाईल, ज्यानंतर विद्यार्थ्यांना मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर आपला निकाल पाहता येईल.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या, शुक्रवार ८ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. राज्य मंडळाने यासंदर्भातील अधिकृत घोषणा केली असून, परीक्षेला बसलेल्या लाखो विद्यार्थ्यांची प्रतीक्षा उद्या संपणार आहे. विद्यार्थ्यांना मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवरून आपला निकाल पाहता येईल.

दहावीचा निकाल कुठे पाहता येणार?
https://sscresult.mahahsscboard.in/
https://results.targetpublications.org/
https://results.digilocker.gov.in https://mahahsscboard.in
https://results.navneet.com
वर दिलेल्या संकेतस्थळांवर दहावीचा निकाल पाहता येणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने गेल्या काही वर्षांपासून दहावी आणि बारावीचे निकाल विक्रमी वेळेत जाहीर करण्याची आपली परंपरा यंदाही कायम ठेवली आहे. पूर्वी जून महिन्यापर्यंत लांबणीवर पडणारे हे निकाल आता मे महिन्यातच हाती येत असून, बारावीचा निकाल २ मे रोजी लागल्यानंतर आता दहावीचा निकालही उद्या, ८ मे रोजी जाहीर होत आहे. या तत्परतेमुळे पुढील प्रवेश प्रक्रिया आणि नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात वेळेत होण्यास मोठी मदत होणार असून, दहावीच्या निकालापाठोपाठ आता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेचा मार्गही मोकळा होणार आहे.

## भारत-व्हिएतनाम बिझनेस फोरममध्ये महाराष्ट्राची छाप; संभाजीनगरसाठी आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटीचा प्रस्ताव

**मुंबई :** भारत आणि व्हिएतनाम यांच्यातील संबंध अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र विश्वासार्ह भागीदार म्हणून कार्य करण्यास सज्ज आहे. व्हिएतनाम सोबत सांस्कृतिक, आर्थिक आणि परस्पर संबंध अधिक दृढ करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांच्या एक दिवसीय मुंबई भेटीदरम्यान आयोजित इंडिया-व्हिएतनाम बिझनेस फोरमला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केले. यावेळी त्यांनी व्हिएतनामच्या उद्योजकांना गुंतवणुकीसाठी राज्यात येण्याचे आवाहन केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारत आणि व्हिएतनाम भागीदारी अधिक दृढ होऊन 'एन्हान्स्ड कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रेटेजिक पार्टनरशिप' नव्या स्तरावर नेल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्रातील बौद्ध धर्माचा समृद्ध वारसा सांगताना मुख्यमंत्र्यांनी नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारुन त्याला आधुनिक काळात मिळवून दिलेल्या अधिष्ठानाचा परिचय दिला. तसेच युनेस्को जागतिक वारसा स्थळ असलेली अजिंठा आणि वेरुळ येथील बौद्ध आणि जैन लेणी येथे व्हिएतनामच्या गुंतवणूकदारांचे स्वागत केले. छत्रपती संभाजीनगर आणि हो चि मिन्ह सिटी यांच्यात थेट हवाई सेवा सुरू करण्यासह स्वतंत्र बौद्ध पर्यटन सर्किट विकसित करण्याचा प्रस्ताव त्यांनी यावेळी मांडला.

मुंबई आणि हो चि मिन्ह मध्ये साधर्म्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही शहरांमध्ये नुकत्याच झालेल्या कराराचे स्वागत केले. तसेच व्हिएतनाम कंपनी विनग्रुपच्या महाराष्ट्रातील ६.५ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या प्रस्तावित गुंतवणुकीच्या कराराचे स्वागत करताना हा दक्षिण पूर्व आशियातून झालेला सर्वात मोठा करार असल्याचे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ जुन २०२६

## दौलताबादच्या कालिका माता मंदिरात पुजारी कुटुंबाला मारहाण; वाहतूक पोलिसासह सात जणांवर आरोप



**दौलताबा** : कालिका माता मंदिराच्या पुजारी व कुटुंबाला वाहतूक पोलिस सह सहकाऱ्यांनी केली मारहाण . मंदिरात सॉक्स पायमोजे घालून आल्याने पुजाऱ्यांनी हटकले असता पोलिसाचा संताप अनावर झाला पुजाऱ्या सोबत मुलगी, आई व मुलगी यांना सात लोकांनी केली मारहाण.

दौलताबाद घाटात पहिल्या वळणावर गुहेत प्राचीन कालिका माता मंदिरात असून या मंदिराचे पुजारी सुभाष सूर्यभान गवळी हे दि ०५ मंगळवारी दिवसभर भाविक दर्शनासाठी येत होते दुपारी दोन ते अडीच वाजेच्या सुमारास तीन पुरुष व चार महिला दर्शनासाठी मंदिरात आलेयावेळी पुजारी सुभाष गवळी यांनी एक पुरुष पायात मौजे घातलेले दिसल्यानंतर त्यांना मंदिरात पायमोजे घालू नका म्हणून हटकले असता त्या इसमाने मला ओळखले काय मी वाहतूक पोलीस आहे नियम दाखव यावरून सुभाष यांनी बाहेर असलेले नियम दाखवले यावरून पुजारी व पोलीस यांच्यात वाद झाला लगेच पोलीस व त्यांचे दोन पुरुष व चार महिला यांनी सुभाष व त्यांच्या आई मुलगी यांना अमानुष मारहाण करण्यास सुरुवात केली सदर घटना ही पूर्ण सी सी कमेरात कैद झालीपुजारी सुभाष यांच्या म्हणण्यानुसार ते पोलीस स्टेशनमध्ये गेले असता त्यांची तक्रार दाखल करण्यात आली नसून समजूत काढून परत पाठवून दिले आहे पोलीस निरीक्षक मंगेश जगताप यांनी शी बोलताना सांगितले की या घटनेची शहानिशा केली असून संबंधित पुजारी व पोलीस कर्मचारी यांना बोलवून घेतले व त्यांनी एकमेका विरुद्ध कोणत्याही प्रकारची तक्रार नसल्याचे सांगितले आहे संबंधित घटनेची पोलीस स्टेशन डायरी मध्ये नोंद करण्यात आली आहेसंबंधित पोलीस कर्मचारी यांच्या शी फोन करून संबंधित विषयी मत मागितले असता कर्मचारी यांनी नंतर सांगतो म्हणून सांगितले

## तुळजापूर येथे ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूरच्या वार्षिक प्रशिक्षणास प्रारंभ



**तुळजापूरू (प्रा.सुधीर पचगल्ले)** : श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालय तुळजापूर येथे ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूरच्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ झाला असून सदर शिबीर ०५ ते १४ मे २०२६ पर्यंत चालणार आहे.या कँपचे कँप कमांडंट कर्नल संतोष नवगण ,डेप्युटी कँप कमांडंट वाय.बी.सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी कँप चालणार आहे . कॅडेसटना विविध प्रकारचे सैनिकी प्रशिक्षण दिले जाणार आहे. या वार्षिक प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना कर्नल संतोष नवगण यांनी एनसीसी कॅडेटना एकता व अनुशासन याचे पालन करून राष्ट्र निर्मिती देशाच्या सामाजिक विकासासाठी एनसीसी कॅडेट यांनी आपले योगदान द्यावे असे आवाहन केले. या कॅम्पसाठी श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयचे प्राचार्य घोडके व्ही बी यांनी कँपसाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे सर्वप्रथम आभार मानले. या कँपचा मुख्य उद्देश २६ जानेवारी २०२७ मध्ये होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी एनसीसी कॅडेट्सची निवड तसेच दिल्ली येथे होणाऱ्या थल सैनिक कँपसाठी निवड केली जाणार आहे .या एनसीसी कॅडेट्सना ड्रिल ,फायरिंग,सांस्कृतिक कार्यक्रम,फ्लॅग एरिया,खेळ , ऑब्सिटिकल , सायबर क्राईम ,बेस्ट कॅडेट,अग्निशमक , आपती निवारण, आरोग्य सुरिक्षितता इत्यादी विषयाचा सराव करून प्रशिक्षण दिले जाणार आहे .या कॅम्प दरम्यान कॅडेट्सना सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन त्याचबरोबर विविध खेळाचे आयोजन केले आहे. या कँपमध्ये लातूर व धाराशिव जिल्ह्याचे शाळा व महाविद्यालयातील जवळपास ४५० एनसीसी कॅडेटस सहभागी झाले आहेत.या कॅम्पच्या यशस्वीतेसाठी सुभेदार मेजर शंभू सिंह,कॅप्टन डॉ चिट्टमपल्ले ज्ञानेश्वर,लेफ्टनंट हरिभाऊ पावडे, घोरपडे अमरसिंह, कुंभार व्ही बी, राजोळे सचिन ,संतोष पाटील ,हरेंदर सिंग,संजय चिकने,देशराज सिंह,बाजीराव पाटील, सुनिल काळे तसेच कार्यालयीन हेड क्लर्क घोगरे बी व्ही , पवार आर आर आर्मी स्टाफ , कार्यालयीन कर्मचारी अथक परिश्रम घेत आहेत .

## संताप अनावर होतो माझा

संताप अनावर होतो माझा,
जातीच्या उतरंडी कधी तुटणार?
देशाला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली,
माणूसपणाला अजूनही बेड्या! कुठपर्यंत राहणार?

घटनेने दिला समानतेचा हक्क,
पण मनामनांत अजून भिंती उभ्या,
नावापुढे जात विचारणाऱ्यांच्या
विचारांना कधी येणार नवी दिशा..

शाळांत एकच धडा शिकवला जातो,
“भारत माझा देश आहे” म्हणतो सारा वर्ग,
पण मोठे झाल्यावर माणसाला
का आठवते जात आणि धर्म

कोणाची विहीर वेगळी,
कोणाचा देव वेगळा,
कोणाच्या सावलीलाही अपवित्र म्हणणारा
हा कसला धर्म अंधळा?

श्रम करणाऱ्यांचे हात काळे,
म्हणून त्यांना कमी लेखणार?
ज्यांच्या घामावर उभा देश,
त्यांनाच दाराबाहेर ठेवणार?

स्वातंत्र्याच्या घोषणांनी
आभाळ दणाणून गेले होते,
पण अनेकांच्या आयुष्यात
आजही अंधारच उरलेले दिसते

मला हवा आहे असा भारत,
जिथे माणूस फक्त माणूस असेल,
ना उच्च-नीच, ना भेदभाव,
फक्त प्रेमाचा सुवास असेल.
त्या दिवसाची वाट पाहताना
मनात ज्वाला पेटत राहिल,
जातीच्या साखळ्या तुटेपर्यंत
माझी लेखणी लढत राहिल.



**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

## जिंतूर - सेनगाव परिसरात बुद्ध मूर्तींची तोडफोड; आरोपींना अटक न झाल्यास १२ मे रोजी धरणे आंदोलनाचा इशारा




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर)** : जिंतूर व सेनगाव तालुक्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तींची तोडफोड झाल्याच्या गंभीर घटना समोर आल्या असून, या प्रकरणामुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. दोषींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अन्यथा १२ मे २०२६ रोजी धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी प्रशासनाला दिला आहे.सेनगाव तालुक्यातील मौजे वाढोना येथील तक्षशिला बौद्ध विहारात उभी असलेली सुमारे १५ फुटांची भगवान बुद्धांची मूर्ती अज्ञात समाजकंटकांनी फोडून तिच्या काही भागास जाळण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना ४ मे रोजी सकाळी उघडकीस आली. विहाराचे प्रमुख भंतेजी बुद्धकिर्ती हे त्या वेळी मुंबई येथे धम्मकार्याकरिता गेले होते. उपासक सकाळी वंदनेसाठी विहारात गेले असता हा प्रकार समोर आला.याचप्रमाणे जिंतूर तालुक्यातील मौजे रायखेडा येथे नागतीर्थ गंधकुटी भैसजे बुद्ध विहारातील भगवान गौतम बुद्धांची मूर्ती ९ एप्रिल २०२६ रोजी तोडण्यात आली होती. या दोन्ही घटनांप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून, तपास सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.मात्र, अद्याप आरोपींना अटक न झाल्यामुळे आंबेडकरी समाजात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटना हेतुपुरस्सर जातीय द्वेषातून घडवून आणल्याचा आरोप कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना तातडीने जेरबंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, प्रशासनाने त्वरित कारवाई न केल्यास जिंतूर तालुक्यातील सर्व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व नेत्यांच्या वतीने १२ मे रोजी एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.या प्रकरणाकडे जिल्हा प्रशासन व पोलीस विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे. उपस्थित भंते महानंद,शरद चव्हाण,अक्षय सुर्यवंशी, बळीराम उबाळे, सतीश वाकळे, शंकर वाघ, राहुल शिंदे , अशोक सुरवशे,राजु तुपसुंदर,आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ जुन २०२६


## अजित पवारांच्या पावलावर पाऊल; जय पवारांचा बारामतीत जनता दरबार



**बारामती :** राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर आता त्यांच्या जागी कोणाला संधी दिली जाणार याची चर्चा रंगली आहे. त्यात मंत्री छगन भुजबळ यांचे नाव आघाडीवर आहे. भुजबळ यांनी राज्यसभेवर जाण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र त्यांच्या जागी सुनेत्रा पवारांना संधी देण्यात आली होती. याच चर्चेत जय पवार यांच्याही नावाची चर्चा आहे. यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. विशेष म्हणजे आज त्यांनी जनता दरबार भरवला होता.

खासदारकीच्या जागेवरून सुरू असलेल्या नावाच्या चर्चेवर जय पवार म्हणाले, चर्चा होत आहे पण मी इथेच सर्वांसाठी काम करेल, असे म्हणत त्यांनी त्यांच्या नावाच्या चर्चेला पूर्णविराम दिला आहे. तसेच २०२९ च्या निवडणुकीवर देखील त्यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, काही दिवसांपूर्वी आमची सहकाऱ्यांसोबत चर्चा झाली, सर्वच बारामतीकरांची इच्छा होती की, दादांना एकदा मुख्यमंत्री पहायचे आहे. आता वहिनी देखील खूप कष्ट घेत आहेत, मला वाटते २०२९ ला बारामतीतून विधानसभेला वहिनीच उभ्या राहतील आणि आमची सर्वांची आशा आहे की, सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री म्हणून ती जागा घ्यायला पाहिजे, असे विधान पवार यांनी केले आहे.

अजित पवार यांनी मुख्यमंत्री व्हावे ही बारामतीकरांसह राज्यातील असंख्य कार्यकर्त्यांची तीव्र इच्छा होती, मात्र त्यांच्या आकस्मिक निधनामुळे हे स्वप्न अधुरे राहिले. आता सुनेत्रा पवार मुख्यमंत्री बनून दादांची ही इच्छा पूर्ण करतील, अशी आशा राष्ट्रवादीचे कार्यकर्ते बाळगत आहेत. त्यातच जय पवार यांनी २०२९ च्या विधानसभा निवडणुकीसाठी सुनेत्रा पवार या बारामतीच्या उमेदवार असतील असे स्पष्ट करतानाच, त्यांनी थेट मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून निवडणूक लढवावी अशी इच्छा व्यक्त केल्याने कार्यकर्त्यांच्या अपेक्षांना आता नवे बळ मिळाले आहे.

दरम्यान, यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, जय पवार यांचे मुख्यमंत्रिपदाबाबतचे वक्तव्य म्हणजे एका मुलाने आईविषयी व्यक्त केलेली भावना आहे, अशी प्रतिक्रिया आव्हाड यांनी दिली आहे.

## जायकाच्या मदतीने महाराष्ट्रातील वैद्यकीय क्षेत्राला बळ; ३७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता

**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या (जायका) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी जायका महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की यापूर्वी आसाम आणि तामिळनाडू सारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर, जायका आता महाराष्ट्रातही ¬‘मेडिकल केअर सिस्टम’ मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषतः राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत खालील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, सध्याच्या शासकीय वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे विशिष्ट आजारांसाठी ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ उभारणे. नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे. आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य, राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता ‘स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम ॲण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र’ हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जॉर्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय अहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, हिंगोली, जालना, मुंबई, नाशिक, परभणी, सातारा, पालघर, रत्नागिरी, वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच भारत-जपान शैक्षणिक आदान प्रदान कार्यक्रमांतर्गत रूग्णालय व्यवस्थापन व प्रशासन मानवसंसाधन विकास यांच्या क्षमता वृध्दीसाठी तरतूद करण्यात येणार आहे.या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील आरोग्यसेवा अधिक दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक होईल .त्यामुळे राज्यातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.एकूणच, जायका आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील ही प्रस्तावित भागीदारी आरोग्य क्षेत्रातील विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.







महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ जुन २०२६

# मानवतेची अखंड ज्योत : जागतिक रेड क्रॉस दिन - डॉ. राजेंद्र बगाटे




मानवजातीच्या इतिहासात युद्धे, नैसर्गिक आपत्ती, रोगराई, दुष्काळ आणि विविध संकटांनी नेहमीच माणसाच्या अस्तित्वासमोर मोठे प्रश्न उभे केले आहेत. अशा संकटांच्या काळात मानवतेच्या रक्षणासाठी काही संस्था आणि व्यक्ती देवदूतासारख्या धावून येतात. जगभरात दु:ख, वेदना आणि संकटात सापडलेल्या लोकांना आधार देणाऱ्या अशाच महान चळवळीचे नाव म्हणजे रेड क्रॉस होय. दरवर्षी ८ मे हा दिवस 'जागतिक रेड क्रॉस दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानवतेची सेवा, सहानुभूती, करुणा आणि नि:स्वार्थ वृत्ती यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. रेड क्रॉस चळवळीचे संस्थापक हेन्री ड्युनाँ यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जगभर साजरा केला जातो. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक, सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.मानवतेच्या सेवेसाठी समर्पित असलेल्या रेड क्रॉस चळवळीचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. १८५९ साली इटलीतील सोल्फेरिनो येथे फ्रान्स आणि ऑस्ट्रिया यांच्यात भीषण युद्ध झाले. या युद्धात हजारो सैनिक जखमी झाले होते. युद्धभूमीवर जखमी सैनिक वेदनेने तडफडत होते, परंतु त्यांच्यासाठी पुरेशी वैद्यकीय मदत उपलब्ध नव्हती. त्या वेळी स्वित्झर्लंडचे व्यापारी आणि समाजसेवक हेन्री ड्युनाँ तेथे उपस्थित होते. त्यांनी ही भीषण परिस्थिती पाहिली आणि त्यांचे मन व्यथित झाले. त्यांनी स्थानिक लोकांना एकत्र करून जखमी सैनिकांना मदत करण्यास सुरुवात केली. 'टुट्टी फ्रेटेली' म्हणजे 'आपण सर्व भाऊ आहोत' हा संदेश देत त्यांनी मानवतेची एक नवीन दिशा जगासमोर ठेवली.या अनुभवातून प्रेरित होऊन हेन्री ड्युनाँ यांनी 'अ मेमरी ऑफ सोल्फेरिनो' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये त्यांनी युद्धातील अमानुष परिस्थितीचे वर्णन केले आणि युद्धग्रस्तांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी मदतसंस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. त्यांच्या या विचारांना जगभरातून प्रतिसाद मिळाला आणि १८६३ साली आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस समितीची स्थापना झाली. पुढे १८६४ मध्ये जिनिव्हा करार झाला आणि युद्धातील जखमी सैनिकांच्या संरक्षणासाठी काही आंतरराष्ट्रीय नियम निश्चित करण्यात आले. याच क्षणापासून रेड क्रॉस चळवळीचा जागतिक प्रवास सुरू झाला.रेड क्रॉस चळवळीची सात मूलभूत तत्त्वे ही तिच्या कार्याची खरी ओळख आहेत. मानवता, निष्पक्षता, तटस्थता, स्वातंत्र्य, स्वयंसेवा, एकता आणि सार्वत्रिकता ही तत्त्वे केवळ शब्द नसून मानवतेच्या सेवेसाठी जगणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या कार्याचे अधिष्ठान आहेत. मानवता हे तत्त्व सर्वात महत्त्वाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत माणसाचे दु:ख कमी करणे आणि त्याचे जीवन सुरक्षित ठेवणे हे रेड क्रॉसचे प्रमुख उद्दिष्ट आहे. निष्पक्षता म्हणजे जात, धर्म, भाषा, वर्ण किंवा राजकीय विचार न पाहता सर्वांना समान मदत करणे. तटस्थतेमुळे रेड क्रॉस कोणत्याही राजकीय किंवा लष्करी संघर्षात पक्षपाती भूमिका घेत नाही. त्यामुळेच जगभरातील लोकांचा या संस्थेवर विश्वास टिकून आहे.रेड क्रॉसचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या काळातही ही संस्था मोठ्या प्रमाणावर मदतकार्य करते. भूकंप, पूर, चक्रीवादळ, त्सुनामी, दुष्काळ यांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसचे स्वयंसेवक तातडीने घटनास्थळी पोहोचतात. तेथे अन्न, पाणी, औषधे, निवारा आणि मानसिक आधार उपलब्ध करून देतात. अनेक वेळा अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणाही अपुऱ्या पडतात, परंतु रेड क्रॉसचे स्वयंसेवक जीवाची पर्वा न करता मदतकार्य सुरू ठेवतात. त्यामुळे लाखो लोकांचे प्राण वाचतात आणि त्यांना नवजीवन मिळते.आरोग्य क्षेत्रामध्ये रेड क्रॉसचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. रक्तदान चळवळीमध्ये या संस्थेची भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. जगभरात रक्तदान शिबिरे आयोजित करून लाखो रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य रेड क्रॉस करत आहे. आजही अपघात, शस्त्रक्रिया किंवा विविध आजारांमुळे अनेक रुग्णांना रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तदान हे सर्वात मोठे दान मानले जाते. रेड क्रॉसने समाजात रक्तदानाविषयी जागृती निर्माण केली आहे. 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश या संस्थेने प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला आहे.कोविड-१९ महामारीच्या काळात रेड क्रॉसने दिलेली सेवा संपूर्ण जगाने अनुभवली. त्या कठीण काळात लाखो लोकांना अन्न, औषधे, ऑक्सिजन आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात रेड क्रॉसने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. लोकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण असताना रेड क्रॉसचे स्वयंसेवक धैर्याने काम करत होते. अनेकांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवले. महामारीच्या काळात मानवतेचे खरे दर्शन घडवणाऱ्या संस्थांमध्ये रेड क्रॉसचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.भारतात रेड क्रॉस चळवळीची स्थापना १९२० साली झाली. भारतीय रेड क्रॉस सोसायटीने देशभरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि आपत्ती व्यवस्थापनाचे उपक्रम राबवले आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवा पोहोचवणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे, प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देणे आणि आपत्तीग्रस्तांना मदत करणे ही या संस्थेची प्रमुख कामे आहेत. भारतामध्ये पूर, भूकंप, दुष्काळ आणि चक्रीवादळांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसने दिलेली मदत लोकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.महाराष्ट्रातही रेड क्रॉसचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. पूरग्रस्त भागांमध्ये मदतकार्य, आरोग्य शिबिरे, रक्तदान मोहिमा आणि विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून ही संस्था समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत आहे. ग्रामीण भागात प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देऊन अनेकांचे जीव वाचवण्यास मदत होत आहे. आजच्या काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित स्वयंसेवकांची गरज वाढत आहे आणि रेड क्रॉस या क्षेत्रात प्रभावीपणे कार्यरत आहे.रेड क्रॉसच्या कार्यामध्ये युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. महाविद्यालये आणि शाळांमध्ये युवक रेड क्रॉसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवा, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित केली जाते. युवकांनी समाजासाठी काम करावे, रक्तदान करावे, पर्यावरण संवर्धनात सहभागी व्हावे आणि संकटाच्या काळात लोकांना मदत करावी, हा संदेश युवक रेड क्रॉसद्वारे दिला जातो. आजच्या तरुण पिढीमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी ही चळवळ अत्यंत उपयुक्त ठरत आहे.जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्यामागे केवळ संस्थेच्या कार्याचा गौरव करणे हा उद्देश नाही, तर समाजामध्ये मानवतेची भावना रुजवणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली तरी मानवी संवेदनशीलता अनेक ठिकाणी कमी होताना दिसते. स्वार्थ, स्पर्धा आणि भौतिकवादाच्या या काळात माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्था मानवतेचे महत्त्व अधोरेखित करतात.मानवतेच्या सेवेसाठी आर्थिक संपत्तीपेक्षा संवेदनशील मनाची अधिक गरज असते. एखाद्या संकटग्रस्त व्यक्तीला आधार देणे, भुकेल्याला अन्न देणे, रक्तदान करणे किंवा आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणे या छोट्या कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवू शकतात. रेड क्रॉस आपल्याला हेच शिकवते की, मानवतेपेक्षा मोठा धर्म कोणताही नाही.आज जगभरात युद्ध, दहशतवाद, हवामान बदल आणि महामारी यांसारखी अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. लाखो लोक विस्थापित होत आहेत, अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्थांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. मानवतेच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या या संस्था जगात आशेचा किरण निर्माण करतात. तंत्रज्ञानाच्या मदतीने रेड क्रॉसने आपले कार्य अधिक प्रभावी केले आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी आधुनिक साधने, माहिती तंत्रज्ञान आणि संप्रेषण माध्यमांचा वापर करून मदतकार्य अधिक वेगाने केले जात आहे.रेड क्रॉसचे स्वयंसेवक हे या चळवळीचे खरे शिल्पकार आहेत. कोणतीही अपेक्षा न ठेवता समाजासाठी काम करणारे हे स्वयंसेवक मानवतेची जिवंत उदाहरणे आहेत. अनेक वेळा स्वत:च्या कुटुंबाची चिंता बाजूला ठेवून ते संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जातात. त्यांच्या सेवेमुळेच लाखो लोकांना नवजीवन मिळते. त्यांच्या कार्यामुळे समाजामध्ये सहकार्य, बंधुभाव आणि एकतेची भावना निर्माण होते.जागतिक रेड क्रॉस दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. समाजात असलेल्या दु:ख आणि वेदना कमी करण्यासाठी प्रत्येकाने काही ना काही योगदान दिले पाहिजे. रक्तदान, अवयवदान, स्वयंसेवा, पर्यावरण संवर्धन किंवा शिक्षणाच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करता येऊ शकते. माणसाने केवळ स्वत:पुरता विचार न करता समाजाच्या कल्याणासाठी पुढे आले पाहिजे. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती सुरक्षित आणि सुखी असेल, तरच खऱ्या अर्थाने मानवतेचा विजय होईल.आज अनेक तरुण सामाजिक कार्याकडे वळताना दिसत आहेत, ही सकारात्मक बाब आहे. समाजमाध्यमांच्या माध्यमातून जनजागृती, निधी संकलन आणि मदतकार्य अधिक प्रभावीपणे केले जात आहे. परंतु केवळ ऑनलाईन सहानुभूती पुरेशी नसून प्रत्यक्ष कृती अधिक महत्त्वाची आहे. रेड क्रॉसची शिकवण आपल्याला कृतीशील मानवता शिकवते. संकटाच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे हीच खरी देशसेवा आणि मानवसेवा आहे.शेवटी असे म्हणता येईल की, जागतिक रेड क्रॉस दिन हा मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. हेन्री ड्युनाँ यांनी सुरू केलेली ही चळवळ आज जगभरातील लाखो लोकांसाठी आशेचा आधार बनली आहे. सेवा, सहानुभूती, बंधुभाव आणि नि:स्वार्थ वृत्ती या मूल्यांवर उभी असलेली रेड क्रॉस चळवळ मानवतेचा खरा चेहरा जगासमोर मांडते. आजच्या काळात प्रत्येकाने या चळवळीपासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात मानवतेची भावना जोपासली पाहिजे. कारण शेवटी माणसाला माणसाचीच गरज असते, आणि संकटाच्या काळात पुढे येणारा मदतीचा हातच खऱ्या अर्थाने मानवतेचा लाल ध्वज ठरतो.



**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल – bagate.rajendra5@gmail.com